**<u>ठळक बातम्या</u>**

- अहमदाबादमधल्या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला, विमानांची अतिरीक्त सुरक्षा चाचणी करण्याचे DGCA चे एअर इंडियाला निर्देश

- नागपूरमध्ये सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना उभा राहणार

- इस्राइलनं केलेल्या हल्ल्यात इराणचे वरिष्ठ लष्करी अधिकारी ठार, हल्ले टाळून राजनैतिक मार्गानं चर्चा करण्याचं भारताचं दोन्ही देशांना आवाहन

**आणि**

- जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचं दक्षिण अफ्रिकेपुढं २८२ धावांचं आव्हान

**<><><><>**

अहमदाबादमध्ये काल कोसळलेल्या विमानाचा ब्लॅक बॉक्स आज सापडला आहे. अपघाताच्या पार्श्वभूमीवर Genx इंजिन असलेल्या बोइंग 787 विमानांची अतिरीक्त सुरक्षा चाचणी करण्याचे निर्देश हवाई वाहतूक महासंचालकांनी एअर इंडियाला दिले आहेत. अपघात स्थळावर आजही तपास आणि मदतकार्य सुरू आहे. न्यायवैद्यक तज्ज्ञांनी आज अपघातस्थळी भेट देऊन सविस्तर तपासणी केली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

***व्हाइस कास्ट***

***विमान दुर्घटनेचं नेमकं कारण अजून पर्यंत कळू शकलेलं नाही. या प्रकरणी आज मेघनी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात आली. विविध सुरक्षा यंत्रणेचे अधिकारी घटनास्थळी तपास करत आहेत. गुजरात एटीएसनं दुपारी घटनास्थळावरून डिजिटल व्हिडिओ रेकॉर्डर ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे. विमान पडलं त्या भागातल्या बेपत्ता असलेल्या स्थानिक नागरिकांचाही शोध सुरू आहे.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी अहमदाबादहून अपर्णा खुंट***

या विमानातल्या २४२ पैकी २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याचं एअर इंडियानं आज जाहीर केलं. मृतांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही समावेश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी रुपाणी कुटुंबाची भेट घेऊन शोक व्यक्त केला. त्यापूर्वी त्यांनी अहमदाबाद सरकारी रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली.

अपघातातून बचावलेले विमान प्रवासी रमेश विश्वासकुमार यांच्याशीही त्यांनी संवाद साधला. या अपघाताबद्दल रमेश विश्वासकुमार म्हणाले

**होल्ड - रमेश बाइट**

दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृतदेहांची डीएनएच्या मदतीने ओळख पटवण्याचं काम सुरू असून, ओळख पटलेले मृतदेह शवविच्छेदनानंतर कुटुंबांकडे सुपूर्द केले जात आहेत. आतापर्यंत ७ मृतदेह संबंधित कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयात सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून गंभीररीत्या होरपळलेले काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली आहे.

दुर्घटनेतल्या जखमींचे प्राण वाचवण्याच्या आशेनं अनेक जण रक्तदान करण्यासाठी मोठ्या संख्येनं पुढाकार घेत आहेत.

**<><><><>**

नागपूरमध्ये सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभा राहणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मॅक्स एअरोस्पेस अँड एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड आणि राज्य शासनाच्या उद्योग विभाग यांच्यात या संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. कारखान्याचं प्रत्यक्ष काम २०२६ पासून सुरू होणार

आहे. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या सुमारे दोन हजार रोजगार निर्मिती होणार असून या प्रकल्पात आठ वर्षांमध्ये ८ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे.

**<><><><>**

दूरसंचार विभागाने सिम कार्डाशी संबंधित नियमांमध्ये बदल केला असून त्यानुसार मोबाईल ग्राहकांना प्रीपेडमधून पोस्टपेड किंवा पोस्टपेडमधून प्रीपेडमध्ये बदलणं सोपं जाणार आहे. दूरसंचार विभागाने प्रक्रियेसाठी लागणाऱ्या ९० दिवसांच्या कालावधीत कपात केली असून हा कालावधी आता ३० दिवसांचा असेल. तसंच या नवीन नियमांनुसार, एकदा बदल केल्यानंतर संबंधित सेवेत उपलब्ध असलेले प्लॅन्स ग्राहकाला आवडले नाहीत तर केवळ ३० दिवसांत पुन्हा बदल करता येईल. मात्र ही सवलत फक्त एकदाच मिळू शकेल.

**<><><><>**

नवी मुंबईत तुर्भे इथल्या एका कंपनीत कार्बन मोनॉक्साईड वायूचा त्रास झाल्यामुळे २७ कामगारांना रुग्णालयात दाखल करावं लागलं. यातल्या ४ कामगारांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आलं आहे. फळांचं पॅकिंग करणाऱ्या या कंपनीत आज वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे जनरेटर लावला होता, त्यातून निघणाऱ्या वायूमुळे कामगारांना श्वसनाचा आणि उलट्यांचा त्रास सुरु झाला. नवी मुंबईतल्या महात्मा गांधी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

**<><><><>**

नवी दिल्लीतून निघालेल्या कैलास मानसरोवर २०२५ यात्रेच्या पहिल्या गटाला आज केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री पबित्रा मार्गेरिता यांनी हिरवा झेंडा दाखवला. यात्रा पुन्हा सुरु करण्यासाठी चीनच्या सरकारने केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिश्री यांनी नवी दिल्ली इथं चीनचे उप परराष्ट्र मंत्री सन वेइडोंग यांची भेट घेतली आणि भारत-चीन द्विपक्षीय संबंधांमधील घडामोडींवर चर्चा केली. परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. बैठकीत आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रात परस्पर संबंधांना आणखी दृढ करण्यावर भर देण्यात आला. यावर्षी कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्यासाठी सहकार्य दिल्याबद्दल परराष्ट्र सचिवांनी आनंद व्यक्त केला . त्याचप्रमाणे दोन्ही देशांमधल्या वादग्रस्त विषयांवर सविस्तर चर्चा करून त्याचं निराकरण करण्यावरही दोन्ही नेत्यांनी एकमत दर्शवलं. दोन्ही देशांमधली थेट हवाई सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी जलदगतीनं पावलं उचलण्याचं या बैठकीत मान्य करण्यात आलं.

**<><><><>**

इस्रायलनं इराणवर केलेल्या हल्ल्यांमधे, इराणच्या संरक्षण विभागातले महत्वाचे अधिकारी मारले गेले. त्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते आयतुल्लाह खोमिनी यांनी आज नव्या लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. त्यानुसार सशस्त्र दलांचे नवे प्रमुख म्हणून अब्दुल रहीम मौसवी काम करतील. महंमद पकपौर इस्लामिक रिव्होल्यूशनेरी गार्ड कोअरचे नवे मुख्याधिकारी असतील, तर खतम अल अन्बियाच्या केंद्रीय मुख्यालयाची सूत्रं अली शादमनी यांच्याकडे असतील.

इस्रायलनं इराणमधल्या महत्त्वाच्या आण्विक सुविधांना आणि निवासी भागांना लक्ष्य केलं. त्यात किमान ५० जण जखमी झाल्याचं इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. तर इराणनं सुमारे १०० ड्रोन्स डागले, त्यापैकी अनेक अडवल्याचा दावा इस्रायलच्या लष्करानं केला आहे.

गरजेनुसार ही लष्करी मोहिम यापुढंही चालू राहील, असं इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांनी म्हटलं आहे. त्यावर, इस्रायलला याची गंभीर शिक्षा भोगावी लागेल, असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते आयतुल्लाह खोमिनी यांनी दिला आहे.

या भागातली परिस्थिती चिघळत असल्याबद्दल जगभरातल्या नेत्यांनी चिंता व्यक्त केली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणला अमेरिकेशी अण्विक करार करण्याचं आवाहन पुन्हा एकदा केलं आहे. इराण राजनैतिक तोडग्यावर विसंबून राहिला तर त्यांच्यावर यापुढं होणारे नियोजित हल्ले आणखी भयानक असतील, असा इशारा ट्रंप यांनी दिला आहे.

दोन्ही बाजूंनी हल्ले टाळावेत, आणि राजनैतिक मार्गानं प्रश्न सोडवावेत असं आवाहन भारतानं केलं आहे. पश्चिम आशियात शांतता आणि स्थैर्य लवकर पुनर्स्थापित करण्याची गरज मोदी यांनी नेतन्याहू यांच्याशी दूरध्वनीवरुन झालेल्या संवादात व्यक्त केली. इस्रायलच्या या हल्ल्यांचा सौदी अरेबिया आणि ओमाननं निषेध केला आहे.

इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांनी जर्मनीचे चान्सलर, आणि फ्रान्सच्या राष्ट्रपतींशीही चर्चा केली. त्यांची चर्चा झाली असून, अमेरिका आणि रशियाच्या अध्यक्षांशी, तसंच ब्रिटनच्या प्रधानमंत्र्याशीही ते बोलणार असल्याचं नेतन्याहू यांच्या कार्यालयानं समाजमाध्यमात म्हटलं आहे.

**<><><><>**

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत लंडन इथं लॉर्ड्सवर सुरू असलेल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानं दक्षिण अफ्रिकेपुढं विजयासाठी २८२ धावांचं आव्हान ठेवलं आहे. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं २१२ धावा केल्या. आणि त्यानंतर दक्षिण अफ्रिकेचा डाव १३८ धावात गुंडाळून ७४ धावांची आघाडी घेतली. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव आज २०७ धावांवर संपला. त्यामुळे त्यांची एकूण आघाडी २८१ धावांची झाली.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण अफ्रिकेच्या - 2 बाद-100 धावा झाल्या होत्या.

**//<><><><>//**